# महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन जिल्हा परिषद चौक, भंडारा ४४१९०४

Email : dmobcbhandara@gmail.com | Phon No. 07184-260483 | www.msobcfdc.org

## योजना - गट कर्ज व्याज परतावा योजना

9881376698
9665278074.

| | | |
|---|---|---|
| १. | उद्देश | फक्त महाराष्ट्रातील इतर मागासवर्गीय प्रवर्गातील महामंडळाच्या निकषांनुसार विहीत केलेल्या वार्षिक उत्पन्न मर्यादितील उमेदवारांच्या बचत गट, भागीदारी संस्था, सहकारी संस्था, कंपनी (कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत) LLP, FPO अशा शासन प्रमाणिकरण प्राप्त संस्थाना बँकेतर्फे स्वयंरोजगार उद्योग उभारणी करिता जे कर्ज जाईल, त्या कर्ज रक्कमेवरील व्याज परतावा हा बँक प्रमाणीकरणानुसार महामंडळाकडुन अदा केला जाईल. |
| २. | योजनेचे स्वरुप | १. नॉन क्रिमिलेअर करिता असलेल्या कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादित असलेल्या उमेदवारांच्या गटांकरीता<br>२. बँकेकडून प्रती गटास कमीत कमी रु १०.०० लक्ष ते जास्तीत जास्त रु. ५०.०० लक्षपर्यंतच्या मंजूर उद्योग उभारणीकरीता.<br>३. मंजुर कर्जावर ५ वर्षापर्यंत अथवा कर्ज कालावधी या पैकी जो कमी असले ते, कर्ज मंजुर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर जास्तीत जास्त १२% व्याजदराच्या आणि रु. १५.०० लाखाच्या मर्यादेत त्यातील व्याजाची रक्कम त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल.<br>४. महामंडळ केवळ बँकेने वेळेत वसूल केलेली योग्य व्याज रक्कम अदा करेल. इतर कोणत्याही शुल्क/Charges/ Fees देयके अदा करणार नाही. |
| ३. | लाभार्थीच्या पात्रतेच्या अटी व शर्ती | १. गटातील लाभार्थ्यांचे कर्ज खाते आधारकार्ड लिंक असणे अनिवार्य राहील<br>२. गटातील लाभार्थ्यांचे किमान वय १८ ते ४५ वर्षे असावे.<br>३. गटातील उमेदवाराने अर्ज करते वेळी या प्रकल्पासाठी व यापुर्वी महामंडळाच्या वा इतर महामंडळाच्या कोणत्याही योजनांचा वैयक्तिक लाभ घेतलेला नसावा.<br>४. गटातील उमेदवार कोणत्याही बँकेचा / वित्तीय संस्थाचा थकबाकीदार नसावा.<br>५. गटाने कर्ज प्रकरण हे सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) या अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे प्रकरण हाताळण्यास सक्षम असलेल्या बँकेत केलेले असावे.<br>६. ही योजना सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या व्यवसायाच्या विस्तारासाठी व योजनेची अमलबजावणी सुरु केल्यानंतर स्थापन झालेल्या नवीन उद्योगासाठी लागू असेल.<br>७. गटाच्या भागीदाराची किमान रु ५.०० कोटीच्या वर ठेवी असलेल्या व कोअर बँकींग सिस्टम असलेल्या राष्ट्रीयकृत / शेड्युल्ड बँकेत खाते असावे.<br>८. गटातील सर्व सदस्यांचा सिबील क्रेडिट स्कोअर किमान ५०० इतका असावा.<br>९. गटाची वेबपोर्टल / महामंडळाच्या संगणक प्रणाली www.msobcfdc.org(व्याजपरतावा योजना पर्याय वर नाव नोंदणी अनिवार्य आहे. त्यानंतर वेबपोर्टलवर कर्ज मागणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरणे आवश्यक आहे.<br>१०. महामंडळाच्या अटी व शर्तीनुसार संगणकीकृत सशर्त हेतुपत्र (Letter of Intent) दिले जाईल. गटास या आधारे बँकेकिडुन कर्ज मंजुर करुन घ्यावे लागेल. |
| ४. | परतफेडीचा कालावधी | बँक निकषानुसार मंजुर कर्जावर ५ वर्षापर्यंत अथवा कर्ज कालावधी या पैकी जो कमी असेल तो. |

- मुख्यालय -

**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ**

प्रशासकीय भवन, ४ था मजला, रामकृष्ण चेंबुरकर मार्ग, चेंबुर, मुंबई ४०० ०७१

फोन नं 022-25275374, 25299685, 25287631

Deshkar Printing Press Bhandara 9975519130